
ePaper

**‘बॉम्बे’ नावावरून उद्धव ठाकरेंची डरकाळी, थेट मंचावरून म्हणाले; आम्ही मुंबई करू**



| वर्ष - 9 । अंक -97 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दि. 30 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- जिथे खेळलो, तिथे माझी दुनिया बनवली!
- आयुष म्हात्रेने मोडला रोहितचा रेकॉर्ड!
- जेव्हा जेव्हा दडपशाही होईल
- चीन पुन्हा वाकड्यात, नवी खेळी!

**मुख्यमंत्र्यांच्या प्रचारसभांना उत्स्फूर्त प्रतिसाद**

**भंडारा–गोंदिया–गडचिरोली–चंद्रपूर येथे प्रचारसभांची मालिका**

# आमच्याकडे नीती, नियत आणि निधीही!

## विकासाचे मॉडेल घेऊन आलो आहोत; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



- मोठ्या गुंतवणुकीची घोषणा, लाडकी बहीण योजनेबाबत आश्वस्त
- आमच्याकडे नीती, नियत आणि निधी—फडणवीसांची विकासगाथा
- गडचिरोलीत 3 लाख कोटींची गुंतवणूक; दक्षिण भारताचे प्रवेशद्वार बनविण्याची घोषणा
- लाडकी बहीण योजना बंद होणार नाही—मुख्यमंत्र्यांची भावनिक हमी
- अतिक्रमण नियमितीकरणासह घरपट्ट्यांची मोठी घोषणा
- भंडारा–गोंदिया–चंद्रपूरमध्ये औद्योगिक प्रकल्पांचा विस्तार
- छोट्या शहरांचा चेहरा बदलण्याची क्षमता सिद्ध—फडणवीस

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभा घेतल्या. प्रत्येक सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सभांमध्ये त्यांनी विकास, गुंतवणूक, शहरांचे नियोजन, लाडकी बहीण योजना, अतिक्रमणांचा प्रश्न, गृहनिर्माण आणि औद्योगिक प्रकल्पांची दिशा अशा विविध विषयांवर सविस्तर भाष्य करत विरोधकांनाही टोला लगावला.**

“आमच्याकडे नीती, नियत आणि निधी—विकासाचे स्पष्ट मॉडेल”, चंद्रपूर येथील सभेत बोलताना फडणवीस म्हणाले, “आम्ही प्रचारसभेत विरोधकांची उणीदुणी काढत नाही. त्यांनी काय केले नाही यावर बोलत बसण्यापेक्षा आम्ही काय करतो आहोत आणि काय करणार आहोत हे सांगण्यासाठी आलो आहोत. आमच्याकडे नीती आहे, नियत आहे आणि विकासासाठी पुरेसा निधी आहे.”

ते पुढे म्हणाले, “छोट्या शहरांचा विकास करण्याची क्षमता आम्ही दाखवून दिली आहे. 2014 नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील शहरे बदलण्यासाठी पहिल्यांदा भव्य योजना सुरू केल्या. लाखो कोटी रुपयांचे निधी शहरांच्या पायाभूत सुविधांसाठी दिले गेले. त्यामुळे शहरी भागाचे चित्र आमूलाग्र बदलत आहे.”

“गावाकडून शहरांकडे लोकसंख्या वाढली, पण दीर्घकालीन नियोजन नसल्यामुळे अनेक शहरांची अवस्था बिकट झाली. आम्ही घरांचे पट्टे देऊन नियमितीकरण करणार आहोत. पट्टा मिळाल्यानंतर विकासकामांना वेग येईल आणि नागरिकांना हक्काची मालकी मिळेल.”

**भंडारा–गोंदिया–चंद्रपूरपर्यंत गुंतवणुकीचा विस्तार**

भंडारा येथील सभेत मुख्यमंत्री फडणवीसांनी मोठी घोषणा करत सांगितले. “लॉयड मेटल्सनंतर टाटा स्टील आणि जेएसडब्ल्यूचे प्रकल्प गडचिरोलीत आले आहेत. आता ही गुंतवणूक केवळ गडचिरोलीत थांबणार नाही. ती भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यांपर्यंत विस्तारेल. पवनी व साकोली भागात मोठ्या विकासकामांची तयारी सुरू आहे.”

या वक्तव्याने विदर्भातील औद्योगिक प्रगतिबाबत आशावाद निर्माण झाला आहे.

**लाडकी बहीण योजना बंद होणार नाही — मुख्यमंत्री आश्वस्त**

विरोधकांनी महिलांमध्ये संभ्रम निर्माण केल्याचा आरोप करत फडणवीस म्हणाले—

“कोणी तरी बिनबुडाचे दावे करत आहे की भाजप सत्तेत आल्यावर लाडकी बहीण योजना बंद होईल. माझ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात ही योजना बंद होणे तर दूरच, उलट आम्ही तिला अधिक मजबूत करू.”

ते पुढे म्हणाले, “गेल्या दीड वर्षांत 50 लाख बहिणींना ‘लखपती दीदी’ करण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. पुढील काळात आणखी लाखो महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करू.”

**अतिक्रमणांचा प्रश्न: सर्वांना पट्टे व घरांची हमी**

मुख्यमंत्र्यांनी झोपडपट्टी आणि अतिक्रमण प्रश्नावरही मोठी घोषणा केली. “झुडपी जंगलात अतिक्रमण करणाऱ्या, बेघर, भूमिहीनांना घरे आणि जमिनीचे पट्टे देणार आहोत. नगर परिषदेमार्फत घरे दिली जातील. सर्व अतिक्रमणांचे नियमितीकरण करण्यात येईल.” ही घोषणा शहरी भागातील हजारो कुटुंबांसाठी दिलासा देणारी मानली जाते.

**गडचिरोलीचे चित्र बदलणार; ‘दक्षिण भारताचे प्रवेशद्वार’**

गडचिरोली येथील सभेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी अतिशय महत्त्वाचे विधान केले. “गडचिरोलीत तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येत आहे. टाटानगरमुळे झारखंडचे चित्र बदलले, त्यापेक्षा मोठी गुंतवणूक येथे येत असल्याने गडचिरोली भविष्यात बदलेल. गडचिरोलीला दक्षिण भारताचे प्रवेशद्वार बनविण्याचे आमचे स्वप्न आहे.” गडचिरोली, देसाईगंज आणि आरमोरी नगर परिषदेतील भाजप उमेदवारांच्या सभेत हा मुद्दा विशेष ठळकपणे मांडण्यात आला.

**राजकीय वातावरण तापले: विरोधकांवर अप्रत्यक्ष टीका**

सभांमध्ये मुख्यमंत्री फडणवीसांनी विरोधकांवर थेट शब्दांत टीका न करता अप्रत्यक्ष संदेश दिला. “आम्ही काम करतो, वचनपूर्ती करतो. केवळ आरोप–प्रत्यारोपांची राजकारण आम्हाला मान्य नाही. जनता विकास पाहते आणि त्यावरच विश्वास व्यक्त करते.” त्यासोबतच काही BJP नेत्यांच्या अलीकडील कठोर विधानांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस-भाजपची संयुक्त सभा अजित पवारांचा महिला उमेदवाराला सवाल

# लव्ह मॅरेज झालयं का....?

## शिंदे यांचा नामोल्लेख टाळत टीका

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील मंचर येथे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकमेकांच्या समोर उभे ठाकणार असल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मंचर नगरपंचायत काबीज करण्यासाठी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपने युती केली असून त्यांचा थेट सामना शिंदे गटाच्या शिवसेनेशी होणार आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपची संयुक्त सभा आयोजित करण्यात आली आहे.**



दरम्यान, सतत आपल्या बिनधास्त वक्तव्यांमुळे चर्चेत राहणारे अजित पवार (AJIT PAWAR) पुन्हा एकदा वादग्रस्त प्रश्नामुळे चर्चेत आले आहेत. सभेत बोलताना त्यांनी मंचर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मोनिका बाणखेले यांना थेट, "तुमचं लव्ह मॅरेज झालंय का?" असा प्रश्न विचारला. सासर आणि माहेर एकाच गावात असल्याने हा प्रश्न विचारल्याचे स्पष्टीकरणही त्यांनी यावेळी दिले. मात्र त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात नवी चर्चा रंगली असून विरोधकांनीही यावर टीकेची झोड उठवली आहे. मंचर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मोनिका बाणखेले यांना दिली आहे. मोनिका बाणखेले पुर्वच्या मोनिका बेंड या उमेदवार फारदेशीर आहेत. मोनिकाताईंचं माहेर पण इथेच आहे आणि सासरपण इथेच आहे. बरोबर आहे ना? मग लव्ह मॅरेज आहे का काय? असा मिश्किल सवाल विचारताच उपस्थितांमध्ये हशा पिकला. सासर आमि माहेर जवळ असलं की जरा शंकेला जागा उरते, पण हरकत नाही, वाईट वाटून घेऊ नका, असी टिप्पणीही त्यांनी यावेळी केली. दरम्यान त्याचवेळी मंचरमधील निवडणूकसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांना विनोदी शैलीत चिमटा काढला. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी भाषण संपवताना 'आता उपमुख्यमंत्री अजित पवार बोलतील' अशी घोषणा केली. मात्र अजित पवार यांनी लगेचच कंद यांना आधी बोलण्याची संधी देण्याची विनंती केली. यावेळी अजित पवारांनी प्रदीप कंद यांची ओळख खास पद्धतीने करून देण्यास सांगितले. "पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादीचे आणि सध्या भाजपचे (BJP) जिल्हाध्यक्ष," अशी ओळख करुन द्यावी, असा चिमटा त्यांनी हसतखेळत काढला. दिलीप वळसे पाटील यांनीही त्याच सुरात ही ओळख करून दिल्यानंतर उपस्थितांमध्ये उत्स्फूर्त हास्याची लहर पसरली. निवडणूक वातावरणात झालेला हा हलकाफुलका प्रसंग आता स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंचर येथील सभेत आपल्या भाषणादरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नामोल्लेख टाळत अप्रत्यक्ष टीका केली. मंचरचा विकास कोण करू शकतो, असा सवाल उपस्थित करताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, स्वतः उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी खासदार शिवाजी आढळराव, तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांची नावे घेतली. मात्र, महायुती सरकारमधील दुसरे उपमुख्यमंत्री असलेल्या एकनाथ शिंदेंचा उल्लेख त्यांनी मुद्दामहून टाळल्याचे स्पष्ट दिसले.

मंचर नगरपंचायतीत शिंदे गटाच्या शिवसेनेशी थेट सामना असल्यामुळे अजित पवारांनी नामोल्लेख टाळतच शिंदेंवर निशाणा साधल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. दरम्यान, सतत आपल्या बिनधास्त वक्तव्यांमुळे चर्चेत राहणारे अजित पवार पुन्हा एकदा वादग्रस्त प्रश्नामुळे चर्चेत आले आहेत.

### विरोधकांनीही टीकेची झोड उठवली

सभेत बोलताना त्यांनी मंचर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मोनिका बाणखेले यांना थेट, "तुमचं लव्ह मॅरेज झालंय का?" असा प्रश्न विचारला. सासर आणि माहेर एकाच गावात असल्याने हा प्रश्न विचारल्याचे स्पष्टीकरणही त्यांनी यावेळी दिले. मात्र त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात नवी चर्चा रंगली असून विरोधकांनीही यावर टीकेची झोड उठवली आहे.मंचर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मोनिका बाणखेले यांना दिली आहे.

# प्राणी संग्रहालयाच्या दरवाढीला मंजुरी

## राजीव गांधी प्राणीसंग्रहालयात अचानक मादी नीलगाईचा मृत्यू

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगरपालिकेच्या कात्रज येथील राजीव गांधी प्राणी संग्रहालयात एका मादी नीलगाईचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून, याबाबतची माहिती प्राणी संग्रहालयाचे संचालक डॉ. राजकुमार जाधव यांनी दिली. नीलगाईच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून प्राथमिक तपासणी सुरू आहे. शवविच्छेदनाचा सविस्तर अहवाल मिळाल्यानंतरच मृत्यूमागील कारण निश्चित करता येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.**




शिरवळ पशुवैद्यकीय महाविद्यालयातील पैथोलॉजी विभागातील तज्ज्ञांकडून मिळालेल्या प्राथमिक अहवालानुसार नीलगाईच्या शरीरात मोठी गाठ आढळून आली आहे. मात्र या गाठीचे स्वरूप आणि त्याचा मृत्यूशी असलेला संबंध याबाबतची खात्री मिळणाऱ्या सविस्तर अहवालानंतरच होणार आहे. मृत नीलगाय ही ५ फेब्रुवारी २०१२ रोजी जन्मलेली मादी होती. प्राणी संग्रहालयात एकूण १ नर व ५ मादी नीलगायी होत्या. या घटनेनंतर आता १ नर आणि ४ मादी नीलगायी प्राणी संग्रहालयात उरल्या आहेत. अशी माहिती प्राणी संग्रहालयाच्या उपसंचालिका डॉ. सुचित्रा सुर्यवंशी यांनी दिली. नीलगाय हे कुरंग कुळातील हरीण असून दिसण्यात गाईशी साम्य असल्याने 'नीलगाय' हे नाव प्रचलित झाले. इंग्रजीत याला 'ब्लूबुल' असे म्हणतात. भारतातील कोरड्या प्रदेशात या प्रजातींचा मुख्य वावर आढळतो. राजस्थान आणि मध्य प्रदेशात यांची संख्या अधिक आहे. गाईसारखे साम्य आणि पवित्रतेची भावना यामुळे या प्राण्यांची शिकार तुलनेने कमी होते. तिकिट दरात तब्बल 50 टक्क्यांनी वाढ करण्याच्या प्रस्तावाला शुक्रवारी महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.

### असे असतील नवीन दर

प्राणीसंग्रहालयात नवीन प्राणी दाखल होणार असतानाच या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले की, प्राणीसंग्रहालयासाठी महापालिकेकडून होणारा खर्च, मिळणाऱ्या महसुलाच्या तुलनेत अनेक पटीने अधिक आहे. प्राण्यांच्या अन्नाचा खर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन, देखभाल आणि विस्तार योजनांवर मोठा निधी खर्च होत आहे.नवीन दरांनुसार प्रौढांसाठी तिकिट 40 रुपयांवरून 60 रुपये, मुलांसाठी 10 रुपयांवरून 20 रुपये करण्यात आले आहे. परदेशी पर्यटकांना 100 ऐवजी 150 रुपये आकारले जातील.

## मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर खंडाळा घाटात वाहतूक कोंडी

# महामार्गावर बर्निंग कारचा थरार!

## वाहनांच्या ८ ते १० किलोमीटर लांब रांगा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**





लोणावळा, प्रतिनिधी:- मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर खंडाळा घाटात शनिवारी पहाटेपासून वाहतूक कोंडी झाली होती. मार्गावर वाहनांच्या ८ ते १० किलोमीटर लांब दुतर्फा रांगा लागल्या होत्या. हि वाहतूक कोंडी सुरळीत होण्याच्या मार्गावर असताना शनिवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास एका चालत्या रेनॉल्ट कारने पेट घेतला आणि लागलेल्या आगीत जळून खाक झाली. या घटनेमुळे वाहतूक कोंडीत आणखी भर पडली. सुदैवाने कारच्या आगीच्या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

शनिवार व रविवारच्या विकेंडच्या सुट्ट्यांचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात पर्यटक आपल्या वाहनांतून लोणावळा खंडाळा व मावळातील पर्यटनस्थळांसह महाबळेश्वर, पाचगणी, कोल्हापूर, सांगली व सातारातील विविध पर्यटन स्थळांकडे हिवाळी पर्यटनासाठी जाण्यासाठी निघालेल्या पर्यटकांच्या वाहनांच्या संख्येमुळे मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर शनिवारी पहाटेपासून प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. शनिवारी पहाटेपासून झालेली वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बोरघाट (दस्तुरी) महामार्गाचे सहायक पोलिस निरीक्षक स्वप्निल पाटील, खंडाळा महामार्गाचे सहायक पोलिस निरीक्षक सुनील अवसरमोल यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही महामार्गाचे पोलिस कर्मचारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत होते.

**१० मिनिटांचा ब्लॉक घेत वाहतूक कोंडीवर नियंत्रण!**

वाहतूक कोंडीत भर होऊ नये यासाठी दोन्ही महामार्ग पोलिसांनी मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या व पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बोरघाट (दस्तुरी) महामार्ग पोलिसांनी बोरघाट महामार्ग पोलिस चौकी जवळील छेद मार्गावरुन वाहतूक पुणे मुंबई लेनवरून (मार्गिका) पुढे खंडाळा बोगद्याच्या पुढे असलेल्या छेद मार्गावर मुंबई पुणे लेनवरून (मार्गिका) पुढे पुण्याकडे रवाना करण्यात आली. १० मिनिटांचा ब्लॉक घेत वाहतूक कोंडीवर नियंत्रण ठेवून वाहतूक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला.

**चालती रेनॉल्ट कार आगीत जळून खाक**

वाहतूक कोंडी सुरळीत होण्याच्या मार्गावर असताना शनिवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या एका चालत्या रेनॉल्ट कारने अमृत अंजन पुल व बोरघाट (दस्तुरी) महामार्ग पोलिस ठाण्या दरम्यान अचानक पेट घेतला. आणि वाहतूक कोंडीत आणखी भर पडली. आग लागल्याचे समजताच कार चालकाने प्रसंगावधान राखत कार मार्गाच्या साईडला घेऊन उभी करत कार चालक आणि कारमधील प्रवासी सुरक्षितपणे बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अवघ्या काही क्षणातच कारला लागलेल्या आगीने रौद्ररूप धारण केले. आगीची माहिती मिळताच तेथेच जवळ असलेल्या महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्यासाठी आयआरबी कंपनीच्या अग्निशमन बंबाला पाचारण केले.

तत्पूर्वी त्या ठिकाणी देवदूत आपत्कालीन पथक दाखल झाले आणि आग विझविण्यासाठी प्रयत्न केला. मात्र आज वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आगीवर नियंत्रण ठेवणे अवघड होत होते. लागलेल्या

# रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

## 50 हून अधिक कंपन्यांचा सहभाग, 1 हजारपेक्षा अधिक नोकरीच्या संधी उपलब्ध!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभाग आणि लाइट हाऊस कम्युनिटी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन (सीएचडीसी) उपक्रमांतर्गत युवक-युवतींसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन चिंचवड येथील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे करण्यात आले होते. या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.**



महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात ५० हून अधिक कंपन्यांनी सहभाग घेत १ हजारपेक्षा अधिक नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या होत्या. यामध्ये फिल्ड ऑफिसर, एक्झिक्युटिव्ह, इंजिनिअरिंग, अकाउंट्स, कस्टमर सर्व्हिस, सेल्स प्रतिनिधी अशा विविध पदांचा समावेश होता. या मेळाव्यात १०वी, १२वी, आयटीआय, डिप्लोमा ते ग्रॅज्युएट अशा सर्व शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांनी सहभाग घेतला. मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांचा सहभाग असल्याने तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. मुलाखतीच्या माध्यमातून कंपन्यांनी विविध पदांसाठी उमेदवारांची निवड करत त्यांना नियुक्तीपत्रही दिले.

महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह लाइट हाऊस कम्युनिटी फाउंडेशनचे विजय प्रकाश, जय देवकर, लखन रोकडे, काकासाहेब भुरे, रुपेश कुऱ्हाडे आदींनी मेळाव्याला भेट दिली.

दरम्यान, डेटा विश्लेषण करून त्या आधारे नागरिकांच्या अडचणी सोडवणे आणि त्यांना सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेकडून सीएचडीसी प्रकल्प कार्यरत असून त्या अंतर्गत या मेळाव्याच्या आयोजन करण्यात आले.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाचे एक उद्दिष्ट म्हणजे शहरातील सुशिक्षित तरुण-तरुणींना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस आणि परिणामकारक उपक्रम राबवणे. आजच्या रोजगार मेळाव्यात तरुणांचा उत्साहपूर्ण सहभाग आणि कंपन्यांकडून मिळालेला उत्कृष्ट प्रतिसाद अत्यंत समाधान देणारा आहे.
>
> **–श्रावण हर्डीकर,** आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> या रोजगार मेळाव्याने कंपन्या आणि तरुणांमधील दुवा मजबूत करून तरुणांना एक परिणामकारक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. कंपन्यांच्या उत्साही सहभागामुळे आणि उमेदवारांच्या मोठ्या प्रतिसादामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.
>
> **– ममता शिंदे,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> आमचे ध्येय समाजातील तरुणांना कौशल्य, मार्गदर्शन आणि योग्य संधी उपलब्ध करून देणे हे आहे. या रोजगार मेळाव्यात विविध कंपन्या आणि तरुण एकाच व्यासपीठावर येऊन परस्पर संवाद साधू शकले, ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. **–तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी




# महाकुंभातील भक्त मोदींवर नाराज का?

**"माझ्या बायकोच्या अंगावर १००- २०० जण पडले. आमचे कपडे सामान सारं काही चोरीला गेलं. आम्हाला इथे मारण्यासाठी बोलावलं आहे का? योगी फक्त साधुसारखे कपडे घालतात. साधूचे काही गुण नाहीत त्यांच्यात..." महाराष्ट्रातून आलेला एक तरुण अतिशय उद्वेगाने सांगतो. "आम्ही इथे गंगा स्नानासाठी आलो, पण घाटापर्यंत पोहोचूच दिलं जात नाही.**

जिथे जावं तिथे रस्ता बंद असतो. काहीच व्यवस्था नसताना योगींनी इथे येण्याचं आवाहन का केलं? पुन्हा कधीही कुंभमेळ्याला येणार नाही." गुजरातच्या लता शर्मा संतापलेल्या दिसतात. हे व्हिडीओ अनुक्रमे 'बीईंग सुमीत ००७' आणि 'विशाल अगरवाल' यांच्या एक्स हँडलवर पोस्ट करण्यात आले आहेत. असे अनेक व्हिडीओ सध्या विविध समाजमाध्यमांवर प्रसारित झाले आहेत. 'द फायनान्शिअल एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार उत्तर प्रदेश सरकारने महाकुंभाच्या आयोजनासाठी सहा हजार ९९० कोटी रुपयांची तरतूद केली होती आणि मेळ्यामुळे सरकारच्या तिजोरीत २५ हजार कोटींची भर पडण्याचा अंदाजही वर्तवला गेला होता. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छायाचित्रं असलेल्या दणदणीत जाहिरातीही केल्या गेल्या. मात्र मौनी अमावास्येला झालेल्या दुर्घटनेत हे सारे दावे गंगेत



वाहून गेले आणि समाजमाध्यमांवर हे दावे खोडून काढणाऱ्या पोस्टचा पूर आला. महाकुंभ सुरू होण्यापूर्वी तिथे उभारलेल्या 'टेन्ट सिटी'ची कौतुकं अनेक वृत्तवाहिन्यांनी केली. तीन हजार स्वयंपाकघरं, २४ तास वीज-पाणी, ११ रुग्णालयं, ५० हजार सुरक्षा कर्मचारी, अडीच हजार सीसीटीव्ही कॅमेरे असे डोळे दिपविणारे आकडे सर्वत्र झळकत होते. मेळा सुरू झाल्यानंतरही सुरुवातीचे काही दिवस सारं सुरळीत सुरू होतं. मात्र गर्दी वाढत गेली आणि भव्यदिव्य व्यवस्था तोकडी पडू लागली. १९ जानेवारीला मेळ्यात आग लागली, २८ जानेवारीला चेंगराचेंगरी आणि ३० जानेवारीला पुन्हा आग. कुरबूर, नाराजीचं प्रतिबिंब टीव्ही वाहिन्यांच्या आधी समाजमाध्यमांवर उमटू लागलं. आपले नातेवाईक हरवल्याचं आणि पोलीस ठाण्यांपासून रुग्णालयांपर्यंत सर्वत्र चौकशी करूनही ते सापडले नसल्याचं सामान्य नागरिक, सांगत आहेत. गैरसोयींबद्दल योगी, मोदी आणि पोलिसांना दोष देत आहेत.एका घाटाकडून दुसऱ्या घाटापर्यंतचा प्रवास सुकर व्हावा म्हणून गंगेवर ३० तात्पुरते पूल उभारण्यात आले आहेत. या पुलांना क्रमांक देण्यात आले आहेत. घाटांवर उंच खांब उभारून त्यावरही क्रमांक टाकण्यात आले आहेत. जेणेकरून स्नानासाठी गेलेल्या व्यक्तींना आपलं सामान कुठे ठेवलं आहे, आपल्याबरोबरची माणसं कुठे थांबली आहेत हे शोधणं शक्य व्हावं. महाकुंभाच्या सुरुवातीच्या काळात रेल्वे स्थानकापासून घाटाच्या अगदी जवळपर्यंत खासगी वाहनं नेता येत होती. मात्र जसजसं अमृतस्नान जवळ येऊ लागलं तशी गर्दी वाढू लागली. मग खासगी वाहनं १०-१२ किलोमीटर दूरवरच्या वाहनतळावर थांबविण्यास सांगितली जाऊ लागली. तिथून पुढचा प्रवास ई-रिक्षाने करण्याची सुविधा होती. मात्र अमृतस्नानाच्या दोन-तीन दिवस आधी ई-रिक्षालाही प्रवेश बंद करण्यात आला. परिणामी आबालवृद्धांना १२-१५ किलोमीटर पायपीट करणं अपरिहार्य ठरलं. नाराजीचा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हाच असल्याचं समाजमाध्यमांतल्या प्रतिक्रियांतून स्पष्ट होतं. 'क्रेडिबल हिस्ट्री' या यूट्युब चॅनलवर महाकुंभात सहभागी झालेली एक महिला सांगत होती, "आमची गाडी २० किलोमीटर दूर उभी करावी लागली. आम्ही संध्याकाळी ४ पासून चालतोय आता मध्यरात्र झाली तरी स्नान झालेलं नाही. पूल बांधले आहेत ते बंद ठेवण्यासाठीच का? फक्त व्हीआयपीच माणसं आहेत का? आम्ही माणसं नाही?" हे 'व्हीआयपी कल्चर' हा महाकुंभात प्रचंड रोषाचा मुद्दा ठरत आहे. गृहमंत्री अमित शहा, योगी आदित्यनाथ, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, संसदीय कार्यमंत्री किरण रिजीजू, बाबा रामदेव, हेमा मालिनी, अनुपम खेर, शंकर महादेवन, गुरु रंधावा, रेमो डिसुझा सारखे सेलिब्रिटी सुखेनैव स्नान करतात."माझ्या बायकोच्या अंगावर १००- २०० जण पडले. आमचे कपडे सामान सारं काही चोरीला गेलं. आम्हाला इथे मारण्यासाठी बोलावलं आहे का? योगी फक्त साधुसारखे कपडे घालतात.

## प्रासंगिक »

## कॅरिबियनचा स्वर्ग!

***सेंट लुसिया हे पूर्व कॅरिबियनमध्ये वसलेले एक सुंदर बेट राष्ट्र आहे.***

जगात असे अनेक देश आहेत ज्यांची नावे ऐतिहासिक, भौगोलिक किंवा सांस्कृतिक कारणांवरून पडलेली आहेत. परंतु सेंट लुसिया (TRAVEL NEWS) हा जगातील एकमेव असा देश आहे ज्याचे नाव थेट एका महिलेच्या नावावर ठेवण्यात आले आहे. कॅरिबियनच्या पूर्व भागात वसलेले हे बेट राष्ट्र केवळ आपल्या सौदर्यासाठीच नव्हे, तर अनोख्या इतिहासासाठी जगभरात ओळखले जाते. सिराक्यूजच्या संत लुसी या तिसऱ्या शतकातील ख्रिश्चन महिलेच्या सन्मानार्थ या बेटाला "सेंट लुसिया" असे नाव देण्यात आले. फ्रेंच खलाशांनी तिच्या सणाच्या दिवशी येथे प्रवेश केल्याने हे नाव अधिकृत झाले.प्राचीन काळात या बेटावर सर्वप्रथम अरावक जमात स्थायिक झाली आणि त्यांनी येथे आढळणाऱ्या इगुआनांच्या मुबलकतेमुळे या भूमीला "लुआनालाओ" म्हणजे "इगुआनांचे बेट" असे नाव दिले. नंतर इ.स. ८०० च्या सुमारास कॅलिनागो लोकांनी येथे ताबा मिळवला आणि बेटाचे नाव "हेवानोरा" असे ठेवले. निसर्गाशी असलेला त्यांचा गाढ संबंध या नावांतून स्पष्ट दिसतो.

अमेरिकेत अध्यक्षपदी ट्रम्प यांचे पुनरागमन,बेरोजगारी, गडगडत असलेला रुपयाचा विनिमय दर आणि निर्यातीपेक्षा सातत्याने वाढणारी आयात यासारखी अनेक आव्हानं अर्थमंत्र्यांसमोर अर्थसंकल्प सादर करतांना असतील आणि तीच त्यांची परीक्षा पाहणारी ठरतील. वर्ष २०२४-२५ मध्ये निवडणुकांमुळे दोन अर्थसंकल्प सादर केलेले होते.

# काय आहेत येत्या अर्थसंकल्पाकडून अपेक्षा...?

आज ट्रम्प २.० या घटनेने पारंपरिक जागतिकीकरण या ध्येय धोरणाने पूर्णपणे यु टर्न घेतला आहे. 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या वादळात भारताला आपली ध्येय धोरणे बदलावी लागतील आणि अर्थसंकल्पाद्वारे भारताला पुन्हा एकदा ( सोन्याचा धूर निघू शकेल असे) गतवैभव प्राप्त करावे लागेल. अर्थात यासाठी आवश्यक असेल ते म्हणजे पूर्णपणे रूढार्थाने प्रचलित असलेली विचारसरणी सोडून 'आऊट ऑफ द बॉक्स' असा संपूर्ण नवीन विचार मांडणारा, भारताचे भविष्य बदलवू शकेल असा अर्थमंत्री. आणि त्याचे प्रमुख हत्यार असेल येणारा अर्थसंकल्प.ट्रम्प २.० या काळात सर्व जगासाठी अनिश्चिततेतचे वातावरण तयार झालेले आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे अमेरिकेची प्रगती मंदावली तर चीन आणि काही विकसनशील देश प्रचंड प्रगती करू लागले अशा एका



कथनामुळे (नॅरेटिव्ह) अमेरिकेने जागतिकीकरणाची साथ सोडून पुन्हा आंतरराष्ट्रीय व्यापारातील संरक्षण धोरण स्वीकारण्याचे जाहीर केले आहे. एलॉन मस्क आणि स्वतः ट्रम्प उद्योजक असल्याने, अमेरिकेतल्या उद्योजकांसाठी धार्जिणे निर्णय घेतले जातील. चीनसह इतर सर्व देशांतून आयत होणाऱ्या वस्तूंवर प्रचंड मोठा आयात कर बसवला जाईल हे आता सर्व जगाला कळून चुकले आहे. अशा परिस्थितीत भारताकडे दोन पर्याय उरतात. एक म्हणजे अमेरिका सांगेल त्या प्रकाराने आयात -निर्यात कर पद्धती स्वीकारून अमेरिकेत निर्यात वाढवणे. चीनकडून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तू कमी होणार असतील तर त्या वस्तूंची निर्यात अमेरिकेच्या अटी मान्य करीत भारताकडून होऊ शकेल. थोडक्यात भारत चीनला पर्याय निर्माण करू शकेल. अर्थात यासाठी भारतीय वस्तूंचा दर्जा उत्कृष्ट असावा लागेल, किंमत कमी असावी लागेल, तसेच अधिक उत्पादनासाठी औद्योगिक धोरण, कामगार कायदे, व्यापार, व्यवसाय नियम, पूर्णपणे बदलावे लागतील. पायभूत सोयी सुविधा या मोठ्या प्रमाणावर निर्माण कराव्या लागतील. त्यासाठी केंद्र, राज्य, स्थानिक शासन संस्था, तसेच वित्त मंत्री, उद्योग वाणिज्य मंत्री, विदेश विभाग मंत्री, कायदा मंत्री, ऊर्जा, वाहतूक, यासारख्या अनेक मंत्रालयांना एकत्र बसून दीर्घकालीन धोरण निश्चित करावे लागेल, मात्र अंमलबजावणी अल्पकाळात सुरू करावी लागेल. यासाठीच पारंपरिक विचारांची चौकात मोडणारा संपूर्ण नवा अर्थविचार मांडावा लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## निविदा प्रक्रिया पूर्ण

## डोंबिवलीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'क्रीडा संकुल'

# डोंबिवलीच्या विकासाला गती!

। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**कल्याण-डोंबिवली (KALYAN-DOMBIVALI) या शहरांच्या विकासासाठी शिवसेना (EKNATH SHINDE GROUP) कायमच आग्रही राहिली आहे. शहराच्या याच विकासाला कुठेही खंड न पाडता गती देत, डोंबिवली येथील ह.भ.प. संत सावळाराम महाराज क्रीडा संकुलाचा विकास आता दृष्टिपथात आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या उभारणीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होणार आहे.**

### ऑलिम्पिक दर्जाचे क्रीडा संकुल



सुमारे ₹१८० कोटी रुपयांच्या निधीतून या भव्य क्रीडा संकुलांची उभारणी केली जाणार आहे. मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथ शिंदे साहेब आणि उद्योगमंत्री मा.ना.श्री. उदय सामंत यांच्या विशेष सहकार्याने या क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर जात आहे.या आधुनिक क्रीडासंकुलात अनेक अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असतील. पंचवीस हजार चौ.मी. क्षेत्रफळाची बहुमजली क्रीडा इमारत. एक हजार दोनशे पन्नास चौ.मी. क्षमतेचा आंतरराष्ट्रीय मानकांचा तरणतलाव आणि चारशे चौ.मी.चा डायव्हिंग पूल व प्लॅटफॉर्म. सोळा हजार चौ.मी. क्षमतेची तळघर पार्किंगची (BASEMENT PARKING) सोय. योगा, जिम्नॅशियम, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कराटे, मार्शल आर्ट, जुडो, स्क्वॅश, स्नूकर, शूटिंग रेंज आणि जिम्नॅस्टिक अशा विविध क्रीडा प्रकारांसाठी येथे अत्याधुनिक सोयी उपलब्ध असतील.या सर्व अत्याधुनिक सुविधांमुळे या ठिकाणी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील स्पर्धांचे देखील आयोजन करणे शक्य होईल.

यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील खेळाडूंना विविध खेळांच्या सरावासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे हक्काचे क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे. कल्याण-डोंबिवली (KALYAN-DOMBIVALI) या शहरांच्या विकासासाठी शिवसेना (EKNATH SHINDE GROUP) कायमच आग्रही राहिली आहे. शहराच्या याच विकासाला कुठेही खंड न पाडता गती देत, डोंबिवली येथील ह.भ.प. संत सावळाराम महाराज क्रीडा संकुलाचा विकास आता दृष्टिपथात आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या उभारणीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होणार आहे.

सुमारे ₹१८० कोटी रुपयांच्या निधीतून या भव्य क्रीडा संकुलांची उभारणी केली जाणार आहे. मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथ शिंदे साहेब आणि उद्योगमंत्री मा.ना.श्री. उदय सामंत यांच्या विशेष सहकार्याने या क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर जात आहे.या आधुनिक क्रीडासंकुलात अनेक अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असतील. पंचवीस हजार चौ.मी. क्षेत्रफळाची बहुमजली क्रीडा इमारत. एक हजार दोनशे पन्नास चौ.मी. क्षमतेचा आंतरराष्ट्रीय मानकांचा तरणतलाव आणि चारशे चौ.मी.चा डायव्हिंग पूल व प्लॅटफॉर्म. सोळा हजार चौ.मी. क्षमतेची तळघर पार्किंगची (BASEMENT PARKING) सोय. योगा, जिम्नॅशियम, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कराटे, मार्शल आर्ट, जुडो, स्क्वॅश, स्नूकर, शूटिंग रेंज आणि जिम्नॅस्टिक अशा विविध क्रीडा प्रकारांसाठी येथे अत्याधुनिक सोयी उपलब्ध असतील.

या सर्व अत्याधुनिक सुविधांमुळे या ठिकाणी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील स्पर्धांचे देखील आयोजन करणे शक्य होईल. यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील खेळाडूंना विविध खेळांच्या सरावासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे हक्काचे क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे.

### अत्याधुनिक सुविधा उपलब्ध

सुमारे ₹१८० कोटी रुपयांच्या निधीतून या भव्य क्रीडा संकुलांची उभारणी केली जाणार आहे. मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथ शिंदे साहेब आणि उद्योगमंत्री मा.ना.श्री. उदय सामंत यांच्या विशेष सहकार्याने या क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर जात आहे.या आधुनिक क्रीडासंकुलात अनेक अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असतील.

# शिक्षक भरती व पदनियुक्ती पटसंख्येनुसारच होणार

## वीसपेक्षा कमी पटाच्या वर्गांवरील शिक्षकांचे 5 डिसेंबरपूर्वी समायोजन

। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळांमधील शिक्षकांच्या(TEACHERS) समायोजनाची प्रक्रिया येत्या ५ डिसेंबरपूर्वी पूर्ण करण्याचे संकेत मिळाले आहेत. उच्च न्यायालयाने (MUMBAI HIGH COURT) १५ मार्च २०२४ च्या 'संचमान्यता' शासन निर्णयाला वैध ठरविल्यामुळे आता शिक्षक भरती व पदनियुक्ती थेट पटसंख्येनुसारच होणार आहे, हे स्पष्ट झाले आहे.**

राज्य सरकारला शिक्षकांची पदसंख्या निश्चित करण्याचा अधिकार आहे, असे मत उच्च न्यायालयाने नोंदवले असून, मात्र अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांना सेवेतून कमी न करता त्यांचे जवळच्या शाळांमध्ये समायोजन करावे, असे स्पष्ट आदेश दिले आहेत. तसेच १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक घेण्यास परवानगी दिली जाऊन, ती न्यायालयाने वैध ठरवली आहे. प्रशांत शिरगुर यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यात सध्या जवळपास १८ हजार १०६ कमी पटसंख्येच्या शाळा आहेत. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या हजारोच्या घरात असून, या ठिकाणी शिक्षक अतिरिक्त ठरण्याची दाट शक्यता आहे. संचमान्यता निर्णयानुसार १० पेक्षा कमी पट असलेल्या शाळेत – १ कंत्राटी शिक्षक २० पेक्षा कमी पट असलेल्या शाळेत – १ कंत्राटी + १ नियमित शिक्षक अशी नेमणूक होणार आहे. त्यामुळे अनेक शाळांतील विद्यमान शिक्षक अतिरिक्त ठरणार असून, त्यांचे समायोजन निकटच्या शाळांमध्ये करण्यात येणार आहे.दरम्यान, १ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने इयत्ता पहिली ते आठवी शिकविणाऱ्या ५२ वर्षांपर्यंतच्या शिक्षकांना दोन वर्षांत 'टीईटी' उत्तीर्ण होण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर २३ नोव्हेंबर रोजी पार पडलेली 'टीईटी' परीक्षा ही त्या शिक्षकांसाठी पहिली संधी होती. सदर निर्णय रद्द व्हावा यासाठी शिक्षक संघटनांच्या हालचाली सुरू असतानाच संचमान्यता शासन निर्णय उच्च न्यायालयाने मान्य केल्याने शिक्षकांमध्ये संभ्रम व अस्वस्थता निर्माण झाली आहे. आरटीई कायदा २००९ नुसार प्रत्येक मुलाला त्याच्या वस्तीपासून चालत जाता येईल अशा अंतरावर प्राथमिक शाळा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. मात्र, शाळा 'समूह' पद्धतीने एकत्र करण्याची योजना हा कायद्याचा सरळ भंग असल्याचा आरोप शिक्षक संघटनांकडून होत आहे.



### संधी देण्याची संघटनेची मागणी

शाळा बंद पडल्यास विद्यार्थ्यांना लांब अंतरावरील शाळांमध्ये जावे लागणार असून, त्यामुळे गळती वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. राज्यात टिईटी / सीटीईटी पास व प्रशिक्षित व बेरोजगार उमेदवार उपलब्ध असताना अपात्र प्रशिक्षणार्थ्यांना ठेवणे म्हणजे एक प्रकारे गुणवत्तेचा हक्क हिरावणे.

**बोलण्याचा अधिकार नाही**

## मौलाना महमूद मदानी यांचे वादग्रस्त विधान

# जेव्हा जेव्हा दडपशाही होईल

## दहशतवादी घटना घडते तेव्हा !



## भाजपने हल्लाबोल सुरू केला

सुनावणी पूजा कायद्याकडे दुर्लक्ष करून केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाला सर्वोच्च म्हणण्याचा अधिकार आहे जोपर्यंत ते संविधानाची अंमलबजावणी करत आहे.", अशी प्रतिक्रिया वादग्रस्त विधान केले आहे.महमूद मदनी म्हणाले, "इस्लाम आणि मुस्लिमांच्या शत्रूंनी जिहादची पवित्र संकल्पना अत्याचार, अराजकता आणि हिंसाचाराशी संबंधित शब्दात रूपांतरित केली आहे.

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जमियत उलेमा-ए-हिंदचे प्रमुख मौलाना महमूद मदनी यांनी एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. "गेल्या काही वर्षांत, विशेषतः बाबरी मशीद आणि तिहेरी तलाकसारख्या प्रकरणांमधील निर्णयांनंतर, न्यायालये सरकारी दबावाखाली काम करत आहेत, असा समज वाढत आहे हे दुःखद आहे. सध्या, ज्ञानवापी आणि मथुरा प्रकरणांची सुनावणी पूजा कायद्याकडे दुर्लक्ष करून केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाला सर्वोच्च म्हणण्याचा अधिकार आहे जोपर्यंत ते संविधानाची अंमलबजावणी करत आहे.", अशी प्रतिक्रिया वादग्रस्त विधान केले आहे.**

महमूद मदनी म्हणाले, "इस्लाम आणि मुस्लिमांच्या शत्रूंनी जिहादची पवित्र संकल्पना अत्याचार, अराजकता आणि हिंसाचाराशी संबंधित शब्दात रूपांतरित केली आहे. लव्ह जिहाद, लँड जिहाद, एज्युकेशन जिहाद आणि स्पिट जिहाद सारख्या संज्ञा वापरणे मुस्लिमांना खोलवर दुखावते आणि त्यांच्या धर्माचा अपमान करते. हे दुर्दैवी आहे की सरकार आणि माध्यमांमध्ये जबाबदार पदांवर असलेल्यांनाही असे शब्द वापरण्यास लाज वाटत नाही. तसेच त्यांना संपूर्ण समुदायाला दुखापत करण्याची पर्वा नाही. हे प्राचीन काळापासून चालू आहे. जेव्हा जेव्हा दहशतवादी घटना घडते तेव्हा तिला जिहाद असे म्हटले जाते. मुस्लिमांवर खोटे आरोप केले जातात. जेव्हा जेव्हा अत्याचार होतात तेव्हा जिहाद होईल."मौलाना महमूद मदनी म्हणाले, "एसआयआर देखील लागू केला जात आहे आणि ही एक अतिशय महत्त्वाची बाब आहे. जर आपण त्यावर लक्ष ठेवले तर आपण निराशा टाळू शकतो. निराशा ही राष्ट्रासाठी विष आहे आणि जर ते जिवंत राष्ट्र असेल तर काय म्हणता येईल. देशाची ६० टक्के लोकसंख्या गप्प बसली आहे."जमियत उलेमा-ए-हिंदच्या राष्ट्रीय प्रशासकीय बैठकीत मौलाना महमूद मदनी म्हणाले, "देशातील सध्याची परिस्थिती अत्यंत संवेदनशील आणि चिंताजनक आहे. दुर्दैवाने, हे म्हणावे लागेल की एका विशिष्ट समुदायाला जबरदस्तीने लक्ष्य केले जात आहे, तर इतर समुदायांना कायदेशीररित्या अधिकारापासून वंचित ठेवले जात आहे, सामाजिकदृष्ट्या वेगळे केले जात आहे आणि आर्थिकदृष्ट्या अपमानित केले जात आहे. त्यांचा धर्म, ओळख आणि अस्तित्व कमकुवत करण्यासाठी पद्धतशीर आणि संघटित प्रयत्न केले जात आहेत, ज्यामध्ये मॉब लिंचिंग, बुलडोझर कारवाया, वक्फ मालमत्ता जप्त करणे आणि धार्मिक मदरसे आणि सुधारणांविरुद्ध नकारात्मक मोहिमा समाविष्ट आहेत."भाजप खासदार आणि राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा यांनी पत्रकार परिषदेत महमूद मदनी यांच्या विधानावर टीका केली. ते म्हणाले, "जमिअत-ए-उलेमा-ए-हिंदचे प्रमुख मौलाना महमूद मदनी यांनी भोपाळमध्ये एका बैठकीत ज्या पद्धतीने म्हटले की, जिथे कोणत्याही प्रकारचा अत्याचार असेल तिथे 'जिहाद' छेडला पाहिजे, तो केवळ प्रक्षोभकच नाही तर फूट पाडणारा देखील आहे. मला वाटते की हा शब्द खूप चुकीचा आहे. आपण जिहादच्या नावाखाली लोकांना केवळ भारतातच नाही तर जगभरात दहशत पसरवताना पाहिले आहे."जमियत उलेमा-ए-हिंदचे प्रमुख मौलाना महमूद मदनी यांनी एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. "गेल्या काही वर्षांत, विशेषतः बाबरी मशीद आणि तिहेरी तलाकसारख्या प्रकरणांमधील निर्णयांनंतर, न्यायालये सरकारी दबावाखाली काम करत आहेत, असा समज वाढत आहे.

# चीन पुन्हा वाकड्यात, नवी खेळी!

## चीनने हिंदी महासागरात वाढवल्या आपल्या हालचाली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचा शेजारी असलेला देश म्हणजे चीन. चीन वारंवार भारताला त्रास देण्याचा प्रयत्न करतो. भारताचा अविभाज्य भाग असलेला अरुणाचल प्रदेश चीनचा भाग असल्याचा दावा तो करत असल्याचे दिसून येत आहे. तसेच संशोधनाच्या नावाखाली चीन आपली जहाजे हिंदी महासागरात पाठवत असतो. त्यामुळे भारत देखील सतर्क झाला आहे. भारताने (INDIA) देखील आवश्यक ती पावले उचलली आहेत.**

चीन संशोधनाच्या नावाखाली आपली जहाजे हिंदी महासागरात पाठवत असतो. हा धोका भारताने ओळखला आहे. भारताने विशाखापट्टणम किनाऱ्यावरील क्षेपणास्त्र चाचणीचा विस्तार केला आहे. त्यामुळे चीनने कोणताही अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न केल्यास भारताने आपली तयारी सक्षम केली आहे. भारत त्याच ताकदीने चीनला प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज झाला आहे.नुकतेच चीनने अरुणाचल प्रदेशमधील एका महिलेला शांघाय एअरपोर्टवर भारतीय म्हणून स्वीकारण्यास नकार दिला. तसेच तिचा पासपोर्ट अवैध असल्याचे घोषित केले. सॅटेलाइट फुटेजचे



विश्लेषक डेमियन सायमन आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, भारताने विशाखापट्टणम भागात आगाम आणि संभाव्य सागरी क्षेत्रात मिसाईल चाचणीचा धोक्याच्या क्षेत्राचा विस्तार केला आहे. यासाठी भारताने एक नोटम जारी केले आहे. भारताने आपल्या या क्षेत्राचा विस्तार केला आहे. आता याची रेंज जवळपास 3,485 किमी इतकी असल्याचे समोर येत आहे.पाच वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर भारत आणि चीनने थेट विमानसेवा पुन्हा सुरू करण्यास

## उड्डाणे स्थगित करण्यात आली

होती आणि कोविड-१९ साथीच्या आजारामुळे त्यात आणखी विलंब झाला.भारताचा शेजारी असलेला देश म्हणजे चीन. चीन वारंवार भारताला त्रास देण्याचा प्रयत्न करतो. भारताचा अविभाज्य भाग असलेला अरुणाचल प्रदेश चीनचा भाग असल्याचा दावा तो करत असल्याचे दिसून येत आहे. तसेच संशोधनाच्या नावाखाली चीन आपली जहाजे हिंदी महासागरात पाठवत असतो.

सहमती दर्शविली आहे. गलवान संघर्षानंतर दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले होते. त्यानंतर, आता हे मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. संबंध सुधारण्याचे संकेतही मिळत आहेत.खरं तर, परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, "या वर्षाच्या सुरुवातीपासून, भारत आणि चीनमधील संबंध हळूहळू सामान्य करण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून, दोन्ही देशांच्या नागरी विमान वाहतूक अधिकाऱ्यांनी थेट हवाई सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी आणि हवाई सेवा करारात सुधारणा करण्यासाठी तांत्रिक स्तरावर चर्चा केली आहे." डोकलाम वादानंतर थेट उड्डाणे स्थगित करण्यात आली.

# ‘या’ रस्त्याला दिले दिवंगत अभिनेते रमेश देव यांचे नाव

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते तब्बल सहा दशके चतुरस्र कामगिरी करणारे ज्येष्ठ अभिनेते कै. रमेश देव(RAMESH DEO) यांच्या ९६ व्या जयंती दिनानिमित्ताने अंधेरी पश्चिम, वर्सोवा येथील रस्त्याचे ‘अभिनेते श्री. रमेश देव मार्ग’ असे नामकरण करण्यात आले.मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंतांचा गौरव करण्यासाठी ‘मराठी चित्रपट कट्टा’चे लोकार्पण आणि रस्त्याचे नामकरण सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी म्हटले, “मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेते रमेश देव यांची महती खूप आहे, या महान कलाकाराच्या नावाचा मार्ग होणे हे समस्त महाराष्ट्रासाठी आणि कलेवर प्रेम करणाऱ्या सर्वांना आनंद देणारा दिवस आहे. ‘मराठी चित्रपट कट्टा’च्या निमित्ताने मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंतांचा सन्मान करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आमदार अमित साटम, नगरसेवक रोहन राठोड या प्रत्येकाने आपापल्यापरीने केलेलं काम महत्त्वपूर्ण आहे.” मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केलेले प्रयत्न आज यशस्वी झाले त्याचा अभिमान




असल्याचे वक्तव्य केले.याप्रसंगी बोलताना अभिनेते अजिंक्य देव यांनी म्हणाले, “आज संपूर्ण देव कुटुंबियांसाठी हा स्वप्नपूर्तीचा आणि आनंदाचा दिवस आहे. आज बाबांच्या प्रेमापोटी इथे उपस्थित असलेल्या सर्वांचे मी आभार मानतो. बाबांच्या नावाचा मार्ग झाला याचा खूप आनंद झाला आहे. यासाठी मी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, भाजप नेते विनोद तावडे, आमदार अमित साटम, नगरसेवक रोहन राठोड यांचे मनःपूर्वक आभार मानतो. या प्रस्तावावर त्यांनी विचार करून पुढाकार घेत यासाठी परवानगी दिली. हे बाबांचे आशीर्वाद आहेत. याचा त्यांनाही निश्चितच आनंद झाला असेल.” याप्रसंगी ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त, ज्येष्ठ गायिका वैशाली सामंत, दिव्या खोसला कुमार, कांचन घाणेकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

## मीसुद्धा सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो

चार वर्षं उलटून गेली तरी अजूनही सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूबद्दल चर्चा होताना दिसत आहे. त्याचे चाहते अजूनही या धक्क्यातून पूर्णपणे सावरलेले नाहीत. सुशांतच्या मृत्यूमागचं गूढ हे अजूनही कायम आहे. पोलिसांनी जरी त्याची केस बंद केली असली तरी याबद्दल सोशल मीडियावर चर्चा होताना आपल्याला पाहायला मिळते. कोणत्याही गॉडफादरशिवाय केवळ स्वतःच्या मेहनतीवर सुशांतने चित्रपटसृष्टीत स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.सुशांतच्या याच स्ट्रगलबद्दल नुकतंच अभिनेता विवेक ओबेरॉयने भाष्य केलं आहे. इतकंच नव्हे तर सुशांतच्या अंत्यसंस्कारावेळी विवेक स्वतः तिथे उपस्थित होता. त्यावेळी सुशांतच्या वडिलांना पाहून त्याला काय भावना मनात दाटल्या याबद्दल विवेकने खुलासा केला आहे. इतकंच नव्हे तर आपल्या अडचणीच्या काळात आपणही सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो हेदेखील विवेकने स्पष्ट केलं.

## मेधाने सांगितला प्रवास

विक्रांत मेसी आणि मेधा शंकर अभिनीत ’12TH फेल’ २०२३ चा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला होता. फक्त २० कोटी बजेट असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तब्बल ६६.५८ कोटींची कमाई केली. ६९ व्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात ’12TH फेल’ चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. हा चित्रपट प्रेक्षकांसह अनेक कलाकारांच्या पसंतीस उतरला आणि त्यांनी भरभरून या चित्रपटाचं कौतुक केलं. या चित्रपटात विक्रांत मेसी याने मनोज शर्मा, तर मेधा शंकरने श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारली होती.’12TH फेल’ चित्रपट २५० भारतीय चित्रपटांच्या यादीत सामील झाला आहे. अशातच चित्रपटात श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारणाऱ्या मेधा शंकरला आपल्या संघर्षाच्या दिवसांची आठवण आली. तिने सांगितले की एक काळ असा होता जेव्हा तिच्या बँकेच्या खात्यात फक्त २५७ रुपये शिल्लक होते.अलीकडेच आयएमडीबीला (IMDB) दिलेल्या मुलाखतीत मेधा शंकरने तिच्या संघर्षातील दिवसांची आठवण सांगितली. ती म्हणाली, ’12TH फेल’ चित्रपटाचा भाग होण्यासाठी तिला खूप वेळ लागला. मेधाने २०१८ मध्ये मुंबईत अभिनेत्री म्हणून आपल्या करिअरला सुरुवात केली. २०२२ मध्ये तिने या चित्रपटासाठी कास्टिंग एजन्सीकडे पहिल्यांदा ऑडिशन दिले. नंतर ती दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा आणि त्यांच्या टीमबरोबर स्क्रीन टेस्टसाठी गेली.ऑडिशनदरम्यान मेधाला हा रोल तिच्यासाठीच आहे असं वाटलं होतं.



## महिलांनी मुलांच्या संगोपनासाठी घरी राहावं

अभिनेत्री काजोल (KAJOL) आणि तिची बहीण तनिषा (TANISHAA) या ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा (TANUJA) यांच्या मुली आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा यांनी यापूर्वी सांगितले होते की, अभिनय ही त्यांची आवड नव्हती, पण आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना हा मार्ग स्वीकारावा लागला. कुटुंबाच्या आर्थिक अडचणींमुळे त्यांना खूप मेहनत करावी लागली, कारण त्यांना घर आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी उचलावी लागली. ही संघर्षमय परिस्थिती पुढेही सुरू राहिली, तनुजा आणि त्यांचे पती शोमू मुखर्जी यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतल्यानंतर तनुजांवर त्यांची दोन्ही मुली – काजोल आणि तनिषा यांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी आली. तनुजा यांच्या मुलींनाही त्यांच्या आईच्या सतत कामानिमित्त घराबाहेर राहण्याची सवय झाली. मात्र, अलीकडील एका मुलाखतीत तनिषाने सांगितले की, माझी इच्छा होती की माझी आई जर काम न करता घरी आमच्याजवळ राहायला हवी होती असे वाटते. तिने हेही म्हटले की, महिलांनी किमान पाच वर्षे आपल्या मुलांवर लक्ष केंद्रित करून नंतरच काम करावे.HAUTTERFLY ला दिलेल्या एका मुलाखतीत तनिषाने सांगितले, “माझी आई आम्ही लहान असताना कामावर जात असे, जर ती कामावर न जाता आमच्याजवळ राहिली असती तर चांगलं झालं असतं. जेव्हा माझा जन्म झाला, तेव्हा आमच्याकडे पुरेसं आर्थिक स्थैर्य नव्हतं, त्यामुळे आईला काम करावं लागलं. ती दिवसाला दोन ते तीन शिफ्टमध्ये काम करत असे. त्यामुळे मला आईला भेटण्याची संधीच मिळत नसे. यामुळे मी तिच्या खोलीत झोपत असे, कारण त्यामुळे मला तिच्या जवळ असल्यासारखं वाटायचं.”

## माधुरीचा ‘हम आपके है कौन’चा खास लूक

बॉलीवूडमधील धक धक गर्ल माधुरी दीक्षित आजही तिच्या अभिनयासह नृत्य कौशल्यामुळे चर्चेत आहे. १९९४ रोजी प्रदर्शित झालेला ‘हम आपके है कौन’ या चित्रपटातील माधुरी दीक्षित आणि सलमान खानची जोडी लोकप्रिय ठरली होती. यात अभिनेत्री विविध प्रकारच्या मॉडर्न आणि एथिनिक लूकमध्ये दिसली होती. या चित्रपटातील गाणी आणि कथानकामुळे चित्रपट हिट झाला होता.मोठ्या कुटुंबासह मित्रपरिवारासमवेत होणाऱ्या भव्य लग्नसोहळ्याचा ट्रेंड त्याकाळी चित्रपटामुळे घराघरांत पोहोचला. चित्रपटात हिंदी सिनेसृष्टीतल्या दिग्गज कलाकारांसह मराठमोळे कलाकारही होते. रेणुका शहाणे, अनुपम खेर, रिमा लागू, अलोक नाथ, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रिया बेर्डे अशी स्टारकास्ट या चित्रपटाला लाभली होती.‘हम आपके है कौन’ चित्रपटातील ‘दीदी तेरा देवर दीवाना’ हे गाणं तेव्हा खूप प्रसिद्ध झालं होतं. या गाण्यामधील माधुरी दीक्षितच्या जांभळ्या रंगाच्या साडीने आणि बॅकलेस ब्लाउजने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं होतं. प्रसिद्ध डिझायनर अण्णा सिंग यांनी त्यावेळी ही साडी डिझाइन केली होती. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळी तब्बल ₹१.५ दशलक्ष किंमतीची ही साडी केवळ फॅशन स्टेटमेंटच नव्हती, तर तिच्या अनोख्या बॅकलेस ब्लाउज आणि फूल स्लीव्हजसह त्याकाळी चर्चेचा विषय ठरली.तीस वर्षांनंतर पुन्हा एकदा माधुरीने ‘दीदी तेरा देवर दीवाना’ या गाण्यातील जांभळ्या साडीमधला लूक रिक्रिएट केला आहे. या लूकचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. ‘डान्स दिवाने’च्या रिॲलिटी शोसाठी माधुरीने या आउटफिटची निवड केली आहे.



## क्रीडा मानसिकतेविषयी प्रश्न कॅप्टन कूलच्या अंदाजाने चाहते फिदा

# जिथे खेळलो, तिथे माझी दुनिया बनवली!

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'भारतासाठी न खेळण्याची अजिबातच खंत नाही. मी क्रिकेट का खेळायला लागलो, असा कायम विचार करायचो. मला क्रिकेट खेळायला, फलंदाजी करायला आणि धावा करायला आवडायचे. मग ते ऑफिससाठी असो, क्लबसाठी असो किंवा मुंबईसाठी! मी जिथे खेळलो, तिथे माझी दुनिया बनवली.**

### मला हरमनप्रीत बनवायचं आहे-मुझुमदार




भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत पहिल्यांदाच वर्ल्डकप आपल्या नावे केला. कोच अमोल मुझुमदार यांच्या मार्गदर्शनाखाली व हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली टीम इंडियाने इतिहास घडवला. संघाने स्पर्धेत शानदार कामगिरी केली. टीम इंडियाच्या वर्ल्डकप विजयाने देशातील जास्तीत जास्त मुलींना प्रेरित केलं आहे. याबद्दलचा एक किस्सा अमोल मुझुमदारांनी सांगितला. 'प्रकाश पदुकोण जेव्हा ऑल इंग्लंड जिंकले तेव्हा घरोघरी बॅडमिंटन रॅकेट दिसत होते, त्याप्रमाणे विश्वनाथन आनंद चेस चॅम्पियन झाला तेव्हा घराघरात बुद्धिबळाचे पट मांडले गेले. त्यामुळे हातात बॅट घेऊन मुली मार्गदर्शनासाठी भेटायला येतात, असं व्हायला लागलं आहे का? क्रीडा मानसिकतेमध्ये सातत्य नसल्याने क्रीडा संस्कृती रूजवण्यासाठी काय व्हायला हवं', असा प्रश्न विचारला गेला.यावर उत्तर देताना प्रशिक्षक अमोल मुझुमदारांनी एक किस्सा सांगितला. ते म्हणाले, "मी पहिल्या प्रश्नाचं उत्तर देताना एक किस्सा सांगेन. सेमीफायनलपूर्वी मी देवळात गेलो होतो. पहाटे ६, ६.३० वाजता. त्या देवळाच्या गाभाऱ्यामध्ये ४-५ महिन्यांचं बाळ घेऊन एक वडील उभा होता. त्याने मला ओळखलं आणि सांगितलं, मला हिला स्मृती किंवा हरमनप्रीत बनवायचं आहे.

"हे मला गाभाऱ्यात त्यांनी सांगितलं म्हणजे विचार करा. मी जेव्हा बाहेर आल्यावर ड्राईव्ह करताना माझ्या लक्षात आलं, की या मुलींनी, या भारतीय महिला क्रिकेट संघाने त्या एका यंग वडिलांच्या डोक्यामध्ये ती छाप पाडली आहे की त्या ४-५ महिन्यांच्या मुलीला त्यांना क्रिकेटर बनवायचं आहे, हा फरक झालाय," असं पुढे प्रशिक्षक अमोल मुझुमदारांनी सांगितलं.अमोल मुझुमदारांना पुढे विचारण्यात आलं की, इतर ४ संघांना हरवलं की नाही यापेक्षा पाकिस्तानला हरवतो की नाही, हे जास्त महत्त्वाचं आहे. तर खेळासाठी असं वातावरण कितपत योग्य आहे असं वाटतं? यावर अमोल मुझुमदार म्हणाले, "राहिली गोष्ट पाकिस्तानची तर जिंकणं महत्त्वाचं आहे.""भारतासाठी न खेळण्याची अजिबातच खंत नाही. मी क्रिकेट का खेळायला लागलो, असा कायम विचार करायचो. मला क्रिकेट खेळायला, फलंदाजी करायला आणि धावा करायला आवडायचे. मग ते ऑफिससाठी असो, क्लबसाठी असो किंवा मुंबईसाठी! मी जिथे खेळलो, तिथे माझी दुनिया बनवली. भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत पहिल्यांदाच वर्ल्डकप आपल्या नावे केला. कोच अमोल मुझुमदार यांच्या मार्गदर्शनाखाली व हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली टीम इंडियाने इतिहास घडवला. प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने स्पर्धेत शानदार कामगिरी केली. टीम इंडियाच्या वर्ल्डकप विजयाने देशातील जास्तीत जास्त मुलींना प्रेरित केलं आहे. याबद्दलचा एक किस्सा अमोल मुझुमदारांनी सांगितला. लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी देशातील क्रीडा मानसिकतेविषयी प्रश्न विचारला. 'प्रकाश पदुकोण जेव्हा ऑल इंग्लंड जिंकले तेव्हा घरोघरी बॅडमिंटन रॅकेट दिसत होते,

त्याप्रमाणे विश्वनाथन आनंद चेस चॅम्पियन झाला तेव्हा घराघरात बुद्धिबळाचे पट मांडले गेले. त्यामुळे हातात बॅट घेऊन मुली मार्गदर्शनासाठी भेटायला येतात, असं व्हायला लागलं आहे का? क्रीडा मानसिकतेमध्ये सातत्य नसल्याने क्रीडा संस्कृती रूजवण्यासाठी काय व्हायला हवं', असा प्रश्न विचारला गेला. यावर उत्तर देताना प्रशिक्षक अमोल मुझुमदारांनी एक किस्सा सांगितला.

### ड्राईव्ह करताना माझ्या लक्षात आलं

सेमीफायनलपूर्वी मी देवळात गेलो होतो. पहाटे ६, ६.३० वाजता. त्या देवळाच्या गाभाऱ्यामध्ये ४-५ महिन्यांचं बाळ घेऊन एक वडील उभा होता. त्याने मला ओळखलं आणि सांगितलं, मला हिला स्मृती किंवा हरमनप्रीत बनवायचं आहे."हे मला गाभाऱ्यात त्यांनी सांगितलं म्हणजे विचार करा. मी जेव्हा बाहेर आल्यावर ड्राईव्ह करताना माझ्या लक्षात आलं, की या मुलींनी, या भारतीय महिला क्रिकेट संघाने त्या एका यंग वडिलांच्या डोक्यामध्ये ती छाप पाडली आहे की त्या ४-५ महिन्यांच्या मुलीला त्यांना क्रिकेटर बनवायचं आहे.

# आयुष म्हात्रेने मोडला रोहितचा रेकॉर्ड!

## अशी कामगिरी करणारा भारताचा युवा पहिलाच फलंदाज ठरला

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईचा युवा फलंदाज आयुष म्हात्रेने कमी वयातच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपला दबदबा निर्माण केला आहे. १८ वर्षीय आयुष म्हात्रेची दुबई येथे १२ डिसेंबरपासून होणाऱ्या अंडर १९ आशिया कप स्पर्धेसाठी भारतीय कर्णधार म्हणून निवड झाली आहे.**



वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे ही जोडी या स्पर्धेत डावाची सुरुवात करताना दिसून येणार आहे. दरम्यान या स्पर्धेला रवाना होण्यापूर्वी त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत विदर्भ संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात त्याने ४९ चेंडूत दमदार शतकी खेळी केली. या खेळीसह त्याने रोहित शर्माचा मोठा विक्रम मोडून काढला आहे.आयुष म्हात्रेने विदर्भ संघाविरुद्ध ४९ चेंडूत शतक झळकवताच मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. हे त्याचं टी -२० क्रिकेटमधील पहिलंच शतक ठरलं. यासह तो प्रथम श्रेणी क्रिकेट, लिस्ट ए क्रिकेट आणि टी -२० क्रिकेटमध्ये शतक झळकावणारा सर्वात युवा फलंदाज ठरला आहे. या बाबतीत त्याने भारताचा स्टार फलंदाज रोहित शर्माचा विक्रम मोडून काढला आहे. रोहित शर्माने हा पराक्रम वय १९ वर्षे ३३९ दिवस इतकं असताना केला होता. आयुष म्हात्रेच्या या दमदार शतकी खेळीच्या बळावर मुंबईने विदर्भाने दिलेलं १९४ धावांचे आव्हान १३ चेंडू शिल्लक असताना पूर्ण केले.आयुष म्हात्रे हा देशांतर्गत क्रिकेटमधील तिन्ही फॉरमॅटमध्ये शतकी खेळी करणारा फलंदाज ठरला आहे. आयुष म्हात्रेने हा पराक्रम वयाच्या १८ व्या (१८ वर्ष १३५ दिवस) वर्षी करून दाखवला आहे. तर दुसऱ्या

### ४९ चेंडूत शतक

चंद या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. त्याने वयाच्या २० व्या वर्षी हा विक्रम आपल्या नावावर केला. तर क्विंटन डी कॉकने २० वर्ष ६२ दिवस इतकं वय असताना हा पराक्रम केला होता. रोहित शर्माचा मोठा विक्रम मोडून काढला आहे.आयुष म्हात्रेने विदर्भ संघाविरुद्ध ४९ चेंडूत शतक झळकवताच मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. हे त्याचं टी -२० क्रिकेटमधील पहिलंच शतक ठरलं.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। रविवार।
। दि. 30 नोव्हेंबर 2025।V

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## जेजुरीच्या सर्वांगीण विकासासाठी

# भाजपा सरकार कटिबद्ध : रविंद्र चव्हाण

### प्रचार सभा: नगरपालिका निवडणुकीत भाजपकडून विकासाचे आश्वासन




। पुरंदर । प्रतिनिधी : महाईन्यूज

**जेजुरी शहर व तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्षाचे सरकार पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. जेजुरी नगरपालिका निवडणुकीत जनता पक्षाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार सचिन सोनवणे तसेच नगरसेवक पदाच्या वीस उमेदवारांच्या प्रचार सभेत ते बोलत होते.**

या प्रसंगी माजी आमदार संजय जगताप, भाजप महामंत्री राजेश पांडे, राज्य सरचिटणीस विक्रांत पाटील, विधान परिषद आमदार योगेश टिळेकर, शहर मंडळ अध्यक्ष सचिन पेशवे, माजी आमदार अशोकराव टेकवडे, बाबाराजे जाधवराव, जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, सचिन लंबाते, मनोहर भापकर, विक्रम माळवदकर, सुधीर गोडसे आदी मान्यवर उपस्थित होते.

देशातील मंदिर पर्यटन आणि धार्मिक स्थळांच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे सांगताना चव्हाण म्हणाले की, "याच विचारांची आणि विकासाभिमुख भूमिकेची सरकार जेजुरीत निर्माण करायची आहे." यावेळी त्यांनी जेजुरीकरांना कमळ चिन्हाला मतदान करण्याचे आवाहन केले.

माजी आमदार संजय जगताप आणि नगराध्यक्षपदाचे उमेदवार सचिन सोनवणे यांनीही आपल्या कार्यकिर्दीतील विकासकामांचा आढावा घेत विरोधकांवर टीकास्त्र सोडले. तसेच कार्यक्रमात जगताप यांनी वीस नगरसेवक उमेदवारांचा परिचय करून देत त्यांची माहिती उपस्थितांना दिली.

## अस्वच्छता केल्यास आता थेट कारवाई!

### स्वच्छता नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी महापालिकेची दंडात्मक कारवाई

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेने शहर स्वच्छतेसाठी घेतलेल्या कठोर भूमिकेअंतर्गत सार्वजनिक स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोठ्या प्रमाणावर धडक कारवाई सुरू ठेवली आहे. आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात नोव्हेंबर महिन्यात एकूण २८ लाख १२ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. नागरिकांमध्ये स्वच्छतेची सवय रुजावी तसेच, स्वच्छता विषयक नियमांचे पालन व्हावे यानुषंगाने ही कारवाई करण्यात आली.**



> पिंपरी चिंचवड शहराची स्वच्छता ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, नागरिकांनी स्वच्छता विषयक नियमांचे पालन करून महापालिकेस सहकार्य करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कारवाई सुरू राहील
> **—डॉ. प्रदीप ठेंगल,** उप आयुक्त, आरोग्य विभाग

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई मोहीम राबविण्यात आली. शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनवण्यासाठी जनजागृतीबरोबरच दंडात्मक कारवाई सातत्याने सुरू असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. या मोहिमेत क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, राजाराम सलगर, अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, तानाजी नरळे, किशोर ननावरे, अतुल पाटील, पूजा दूधनाळे यांच्या नेतृत्वाखाली सहा. आरोग्य अधिकारी राजू साबळे, सुधीर वाघमारे, तानाजी दाते, Vशांताराम माने, राजेश भाट, किशोर दरवडे, महेश आढाव, अंकुश झिरे मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक,सहा. आरोग्य निरीक्षक तसेच महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046